आर.सी.सी.क्र.८३३/२०१०
शासन वि. मुस्तफा व इतर
नि.क्र.५३

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.२ चा शपथेवर जबाब
माझे नांव — प्रेमदास बाबुराव वनारसे,
माझे वय – ६२ वर्ष , धंदा : सेवानिवृत्त
राहणार – जालना, ता. जि. जालना.

**सरतपास सहाय्यक सरकारी वकील श्रीमती जे. डी. राठोड यांच्यामार्फत सूरू**

०१. सन २०१० मध्ये सदर बाजार पोलीस ठाणे येथे पोलीस हेड कॉन्स्टेबल म्हणुन कार्यरत होतो. मी व ए.एस.आय श्री. शिंगणे पोलीस ठाणे येथे हजर असतांना फोन आला की, बुंदेले चौक येथे चंदन चोर आले आहेत. त्याप्रमाणे मी व श्री.शिंगणे तेथे गेलो असता दोन जणांनी संशयीत इसमास पकडुन ठेवले होते. त्याला त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव सय्यद मुस्तफा असे सांगितले. त्याच्या ताब्यामध्ये चंदनाचे लाकुड मिळुन आले. त्या इसमास आम्ही पोलीस ठाणे येथे घेऊन आलो. त्यानंतर श्री.शिंगणे यांनी फिर्याद दाखल केली. जप्त मुद्देमाल दाखविल्यास मी ओळखु शकेल. आता मला जप्त मुद्देमाल चंदनाचे लाकुड दाखविण्यात आले. ते तेच आहे. त्यास आर्टिकल 'अ' देण्यात येते. आरोपींना दाखविल्यास ओळखु शकेल.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. सय्यद तारीक यांच्यामार्फत सुरु–**

०२. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीकडुन चंदनाचे लाकुड मिळुन आले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगतो त्याप्रमाणे घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, जप्त लाकुड मी आज रोजी न्यायालयासमोर पहिल्यांदा पाहत आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी यांच्या सांगण्यावरुन आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,
स्वाक्षरीत/–
(सि. म. पाडोळीकर)
मुख्य न्यायदंडाधिकारी, जालना.

दि. ०८.०४.२०२६.